जळगाव जिल्हा पोलीस
दिनांक २५/०२/२०२५

-: प्रेस नोट :-

प्रति,

मा.संपादक ,

----------------

**गांजा विक्री करणा-या आरोपीतास ताब्यात घेवून केली कारवाई.**

--- ००० ---

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, चोपडा ते धरणगाव रस्त्यावर निमगव्हाण ता.चोपडा येथे एक इसम मोटार सायकलवर गांजा विक्री करणार आहे याबाबत खात्रीशीर बातमी मिळाली.

मिळालेल्या बातमी वरून स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अमंलदार तसेच चोपडा ग्रामीण पो.स्टे. अधिकारी व अमंलदार यांनी एकत्रीत येवून चोपडा धरणगाव रस्त्यावर निमगव्हाण गावाजवळ सापळा लावून थांबले असतांना मिळलेल्या बातमी प्रमाणे चोपडाकडुन कडून येणाऱ्या इसमास ताब्यात घेवून त्यांना त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव अनुक्रमे १) अमित दिलीप बरडे वय३२ वर्षे रा.दोंदवाडे जोगवाडा ता.नेवाली जि.बडवाणी राज्य मध्यप्रदेश यास ताब्यात घेवून त्याचे कडून १३४०००/- रु. कि.चा १३ किलो ४८३ ग्रॅम वजनाचा गांजा , टीव्हीएस ज्युपीटर मोटार सायकल क्रमांक MP४६-ZC-६४४३ व १ मोबाईल असे एकुण २,४४,०००/- रु कि.चा मुद्देमाल हस्तगत करून त्यांचे विरुध्द चोपडा ग्रामीण पो.स्टे. ला CCTNS NO २६/२०२५ NDPS ॲक्ट ८(क),२०(ब),२२(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री कावेरी कमलाकर, पोलीस निरीक्षक, चोपडा ग्रामीण, पोउपनिरी श्री गणेश वाघमारे, श्रेपोउनि श्री अनिल जाधव, दिपक माळी, रविंद्र पाटील, हेमंत पाटील, प्रदिप चवरे सर्व नेम.स्थागुशा जळगाव तसेच चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशनचे सफौ राजू महाजन,पोहवा श्रीकांत गांगुर्डे, महेंद्र भिल,रावसाहेब पाटील, मनेश गावोत, निलेश पाटील,विठठल पाटील, चेतन महाजन, यांनी केली आहे.

सदरची कारवाई ही मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव, मा.श्री.बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक, स्थागुशा जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

**( बबन आव्हाड )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव.